RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ६, अंक ६५]                सोमवार, जुलै २७, २०२०/श्रावण ५, शके १९४२                [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १६४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**ग्रामविकास विभाग**

२५, मर्झबान पथ, बांधकाम भवन, मंत्रालय, फोर्ट,
मुंबई ४०० ००१, दिनांक २७ जुलै २०२०.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८**

क्रमांक ग्रापंनि-२०२०/प्र.क्र. २६/पंरा-२.—ज्याअर्थी, राज्यातील १९ जिल्ह्यातील १५६६ ग्रामपंचायतींची मुदत एप्रिल २०२० ते जून २०२० दरम्यान समाप्त झाली असून १२६६८ ग्रामपंचायतींची मुदत जुलै २०२० ते डिसेंबर २०२० या कालावधी दरम्यान समाप्त होत आहे.

आणि ज्याअर्थी, सध्याची जगभर पसरलेल्या साथीचा रोग (कोव्हीड १९) देशात तसेच महाराष्ट्रात संक्रमित होत असल्याने निवडणूक आयोगाने पुढील आदेशापावेतो स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे ढकललेल्या आहेत.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ च्या कलम १५१ मधील पोट-कलम (१) मध्ये, खंड (क) मध्ये सन २०२० चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. १०, दिनांक २५ जून २०२० अन्वये, नैसर्गिक आपत्ती किंवा आणीबाणी किंवा युद्ध किंवा वित्तीय आणीबाणी किंवा प्रशासकीय अडचणी किंवा महामारी यामुळे राज्य निवडणूक आयोगाच्या वेळापत्रकानुसार पंचायतीच्या निवडणुका घेणे शक्य झाले नसेल तर राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे अशा ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून योग्य व्यक्तीची नियुक्ती करण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे.

त्याअर्थी, आता, राज्य शासनास असलेल्या महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ च्या कलम १८२ मधील पोट-कलम (१) मध्ये आणि त्यापैकी सर्व किंवा कोणतेही अधिकारानुसार–

(१) राज्य शासन, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ च्या कलम १५१ मधील पोट-कलम (१) मध्ये, खंड (क) मध्ये असलेल्या तरतुदीनुसार संबंधित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून योग्य व्यक्तीची नियुक्ती करण्यासाठी प्राधिकृत करत आहे; आणि

(२) तसेच, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर नियुक्ती आदेश निर्गमित करण्यापूर्वी संबंधित जिल्ह्यांचे पालक मंत्री यांच्याशी सल्लासमलत करण्याचे निदेश देत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अरविंद कुमार,**
शासनाचे अतिरिक्त मुख्य सचिव.

## RURAL DEVELOPMENT DEPARTMENT

Bandhakam Bhavan, 25, Marzaban Road, Fort,Mumbai 400001,
dated the 27th July, 2020.

### *NOTIFICATION*

MAHARASHTRA GRAM PANCHAYATS ACT, 1959.

No. Grapni-2020/C.R. 26/Para-2.—Whereas, the term of 1566 Panchayats in 19 districts of the State have expired between April 2020 to June 2020 and the term of 12668 Panchayats will expired between July 2020 to December 2020;

And whereas, due to the current spread of epidemic of Covid-19 in the State, the Maharashtra State Election Commission has postponed the proceedings regarding holding of local body elections until further order;

And whereas, the second proviso to clause (a) of sub-section (*1*) of section 151 of the Maharashtra Village Panchayat Act (III of 1959), as added by the Maharashtra Village Panchayats (Amendment) Ordinance, 2020 (Mah. Ord. X of 2020), empowers the State Government to appoint a suitable person as the administrator on panchayat, by notification in the *Official Gazette,* if due to natural calamity or emergency or war or financial emergency or administrative difficulties or epidemic, it is not possible to hold Panchayat elections as per the schedule of State Election Commission;

Now therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 182 of the said Act and of all other powers enabling it in that behalf,—

(*i*) The State Government hereby authorizes, the Chief Executive Officer of the concerned Zilla Parishad to exercise the powers of the State Government under the second proviso to clause (a) of sub-section (*1*) of section 151 of th#äe said Act, to appoint suitable person as administrator on the village panchayat; And

(*ii*) Directs such Chief Executive Officer to take the advice of the Guardian Minister of the concerned Distict before issuing such order.

By order and in the name of the Governor of Maharahstra,

ARVIND KUMAR
Addl. Chief Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.